# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : -
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. प्रतिभा यशवंत कुलकर्णी

---

अचानकच आला हो
तो भीषण काळ,
घरदार हादरले,
कोसळले हो आभाळ.      ....१

तन मन विस्कटले
झाला नशिबाचा वार,
कर्क रोगाने केला हो,
माझ्यावर  प्रहार.     ....२

रिपोर्ट पाहून निसटली,
पायाखालची जमीन,
घाव घातल्या देवानेच,
उपाय सुचवले नामचीन.     ....३

उपाय केले योग्य,
बरा होत होता आजार,
पण मनाच्या खिन्नतेने,
होत होते मी बेजार.       ....४

प्रथमच ऐकले मी,
संगीतोपचार हे नाव,
संगीतोपचार नावानेच घेतला,
मनाचा हो ठाव.        ....५

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

आधी केला फ्री कोर्स,
मग केला हो पेड,
संगितोपचाराचेच मग
लागले की हो मला वेड. ....६

अभ्यास करता करताच,
जाणवू लागले बदल,
मन झाले हो प्रसन्न,
सर्व सिद्धीचे कारण. ....७

विषण्णता गेली पळून,
मन सदाचे बहरले,
ही तर देवाचीच दया,
तया हात मी जोडले. ....८

सापडला आनंदाचा मार्ग,
आहे हे आनंदाचे जळ,
देऊ मित्र, आप्त, स्वकियांना,
संगीताचे हे बळ.
देऊ मित्र, आप्त, स्वकियांना,
संगीताचे हे बळ ....९

Anahat Music Therapy